पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५८ वा | सोमवार, दि. २५ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कांदा उत्पादक उद्ध्वस्त! गेल्या चार महिन्यांत कांदा उत्पादकांचे ४०० कोटींचे नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कांद्याला बाजारात अवघा एक रुपया प्रति किलो इतका नीचांकी दर मिळत असून कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. गेल्या चार महिन्यांत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्री झालेल्या कांद्यामध्ये शेतकऱ्यांच्या खिशातील जवळपास ४०० कोटी रुपये बुडाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

केंद्र सरकारच्या निर्यातबंदी व ग्राहकधार्जिण्या धोरणाचा हा मोठा फटका असल्याची भावना शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

शुक्रवारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला किमान अवघे १०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. चालू वर्षातील हा नीचांकी दर मानला जात असून उत्पादक शेतकरी अक्षरशः देशोधडीला लागला आहे.




खरीप कांद्याला हंगामाच्या सुरुवातीला काही प्रमाणात समाधानकारक दर मिळाले होते; मात्र अतिवृष्टीमुळे उत्पादन घटल्याने त्याचाही फारसा फायदा शेतकऱ्यांना झाला नाही.रब्बी हंगामात मात्र परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. नोव्हेंबरपासून कांद्याचे दर सातत्याने उत्पादन खर्चापेक्षा कमी राहिले आहेत. गेल्या चार महिन्यांची आकडेवारी पाहता सोलापूर बाजार समिती परिसरात विक्री झालेल्या कांद्यामध्ये शेतकऱ्यांच्या भांडवली गुंतवणुकीतील तब्बल ३९५ कोटी रुपये बुडाल्याचे दिसून येत आहे.




यात शेतकऱ्यांच्या श्रममूल्याचाही समावेश नसल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, वाढलेले बियाण्यांचे दर, मजुरी, रासायनिक खतांचे गगनाला भिडलेले भाव, औषध फवारणीचा खर्च आणि बदलते हवामान यामुळे कांद्याचा उत्पादन खर्च प्रतिकिलो १८ रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

मात्र बाजारात सरासरी अवघा ६ रुपये प्रति किलो दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना प्रतिकिलो १० ते १२ रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. दरकपातीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून अनुदानाची अपेक्षा होती. मात्र याबाबत कोणतीही ठोस घोषणा न झाल्याने उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

राज्यात कांद्याच्या बाजारभावाचा प्रश्न गंभीर बनला आहे. भाव मोठ्या प्रमाणात कोसळल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना वाहन भाड्यापोटी स्वतःच्या जवळचेच पैसे द्यावे लागत आहेत.

त्यातच नाशिक जिल्ह्याच्या चांदवड तालुक्यातील एका कांदा उत्पादक शेतकऱ्याने आपले जीवन संपवले आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांनी सोलापूर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा विषय मांडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून 'देवाभाऊ कांदा व्हॉटसअप, इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर विकत घ्यायचा नाही, तर शेतकऱ्यांना विकत घ्यायचा होता,' अशी आठवण करून दिली आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी आपल्या सोशल अकाउंटवरून सोलापूर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सातारा जिल्ह्यातून केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या समोर केलेल्या घोषणेची आठवण मुख्यमंत्र्यांना करून दिली आहे.

शेट्टी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, देवाभाऊ कांदा व्हॉटसअप, इन्स्टाग्राम व फेसबुकवर विकत घ्यायचा नाही, तर तो शेतकऱ्याकडून विकत घ्यायचा होता. देवाभाऊ ऊर बडवून सांगत आहेत, राज्य सरकार कांदा 12 रुपए 35 पैसे किलोने खरेदी करत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील शशिराव तोदेकर या शेतकऱ्याने 1287 किलो कांदा 1468 रूपयांना विकला. त्या शेतकऱ्याचे हमाली, तोलाई, वाहनभाडे मिळून एकूण 1769 रुपए खर्च झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यालाच जवळचे 301 रुपए द्यावे लागले आहेत. या शेतकऱ्याचा कांदा सरासरी 1 रुपए 14 पैसे किलोने विकला गेला आहे. देवाभाऊ नेमकं कांदा शेतकऱ्यांचा खरेदी करताय की व्यापाऱ्यांचा हे जरा जनतेला सांगा, असेही राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील गुलाब केशव निकम या शेतकऱ्याने कोसळलेल्या बाजारभावमुळे आपले जीवन संपवले आहे, त्यामुळे कांद्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. राज्य सरकार आता यावर काय तोडगा काढणार, याची उत्सुकता शेतकऱ्यांना आहे.

- गेल्या चार महिन्यांतील कांद्याची आवक अन सरासरी दर प्रतिक्विंटल
- जानेवारी – १२ लाख ५० हजार १४९ क्विंटल सरासरी दर : ८५० रु.
- फेब्रुवारी – ९ लाख ७२ हजार १५७ क्विंटल सरासरी दर : ८०० रु.
- मार्च – ८ लाख ८४ हजार ५१३ क्विंटल सरासरी दर : ६५० रु.
- एप्रिल – ५ लाख ६९ हजार २९ क्विंटल सरासरी दर : ६०० रु.

# मुळेगाव तांडाच्या विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही- खा. डॉ. ज्योतीताई वाघमारे

## नूतन खासदार निवडीबद्दल नागरी सत्कार व महिलांना साडी वाटप कार्यक्रम संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरातील दलित वस्तीत पत्र्याच्या घरात राहणाऱ्या देशाच्या सर्वोच्च सभागृहात खासदार म्हणून संधी देऊन शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागासवर्गीय समाजाचा सन्मान वाढवून शिवसेनेची संस्कृती व परंपरा जपून नवा आदर्श निर्माण केला आहे असे भावनोदगार नूतन राज्यसभा खासदार डॉक्टर ज्योतीताई वाघमारे यांनी मुळेगाव तांडा येथील नागरी सत्कार कार्यक्रम प्रसंगी काढले दक्षिण तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे आयोजित नूतन राज्यसभा खासदार निवडीबद्दल नागरी सत्कार व त्यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांना साडी वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी माजी मंत्री व शिवसेना नेते सिद्धाराम म्हेत्रे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संपर्क प्रमुख महेश नाना साठे, नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, माजी जिल्हाप्रमुख मनीष काळजे, नगरसेवक प्रियदर्शन साठे, माजी पंचायत समिती सदस्य धनेश आचलेरे ,माजी नगरसेविका शैलेजाताई राठोड, ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे शहर युवक अध्यक्ष व उपशहर प्रमुख अंकुश राठोड ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे जिल्हा युवक अध्यक्ष संदीप राठोड, अशोक चव्हाण, सुमित दादा पवार, आदी मान्यवर उपस्थित होते



प्रारंभी कार्यक्रमाचे संयोजक व शिवसेना युवा नेता संदीप राठोड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकेत कार्यक्रमाचे महत्त्व विशद करून मुळेगाव तांड्याच्या समस्या मांडल्या व विकास निधीची मागणी केली नूतन खासदार निवडीबद्दल नागरिकांच्या वतीने फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पहार अर्पण करून भव्य सत्कार करण्यात आला व माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व मान्यवरांच्या हस्ते 1001 महिलांना साडी वाटप करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला सत्काराला उत्तर देताना खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील हुशार व होतकरू कार्यकर्तेला सर्वोच्च सभागृहात खासदार म्हणून पाठवल्याबद्दल शिवसेना नेते एकनाथराव शिंदे साहेब प्रमुख शिवसेना नेत्यांचे आभार मानले माझ्या निवडीबद्दल संदीप अण्णा राठोड यांच्या पुढाकाराने भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संदीप राठोड यांचे आभार मानले माझा सत्काराचा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संदीप राठोड विषयी म्हणाल्या की राठोड आपण पत्र्याच्या घरात राहत असून सर्वसामान्य साठी सतत धडपडत राहता ही ताकद पत्र्याच्या घरात नसून तुमच्या मनगटात आहे त्यामुळे मी व आमची शिवसेना सदैव तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले मुळेगाव तांड्याच्या विकासासाठी विकास निधी कमी पडू देणार नाही यांची जबाबदारी मी घेईन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शंकर राठोड, काशिनाथ पवार, शिवाजी राठोड, शिवाजी चव्हाण, नामदेव शिंगाडे मारुती शिंगाडे, गणेश निकम, बालाजी पवार, शिवाजी पवार, रमेश राठोड ,संजय राठोड, किशोर जाधव, सोमनाथ जाधव, सुभाष जाधव, अशोक राठोड, विलास जाधव, धोंडीराम चव्हाण, किसन राठोड, दास चव्हाण, विशाल जाधव, संजय राठोड, सागर पवार, युवराज पवार, मनोज राठोड, बाबू पवार, रितेश राठोड, प्रशांत राठोड, अनिल पवार, कार्यक्रम कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्हनमाने सर आणि उपस्थितांचे आभार रमेश राठोड सरांनी मानले या कार्यक्रमास परिसरातील नागरिक युवक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 28 मेपर्यंत मागण्या मान्य करा, अन्यथा उपोषण होणारच!

**अंतरवली (कटूसत्य वृत्त):-** फडणवीस सरकारने 28 मेपर्यंत मराठा समाजाच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा उपोषण होणारच, अशी स्पष्ट भूमिका मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे–पाटील यांनी भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यासमोर मांडली. मागण्या मान्य न झाल्यास 30 मे रोजी तीन कोटी मराठे आंतरवालीत येणार म्हणजे येणारच, असेही जरांगे यांनी ठणकावून सांगितले.



मराठा आरक्षणासाठी 30 मेपासून पुन्हा आमरण उपोषणाला बसणार असल्याचे मनोज जरांगे–पाटील यांनी जाहीर केले आहे. या उपोषणासाठी आंतरवाली सराटीत तीन कोटी मराठे येणार असून आतापर्यंतचे सर्वात मोठे उपोषण असेल असेही त्यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर आज भाजप आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे यांची भेट घेतली. दोघांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली. यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारने कशा पद्धतीने मराठा समाजाची फसवणूक केली हे सांगितले. सरकारला उपोषण थांबवायचे असेल तर 28 मेपर्यंत मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आमचा उपोषणाचा मार्ग खुला असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले. तर 28 मेपर्यंत मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्या नाहीतर आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा प्रसाद लाड यांनी केली. जरांगे यांची भेट घेण्यासाठी आलेल्या लाड यांना धमकी दिली. धमकी देणाऱ्या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

### मनोज जरांगे यांच्या मागण्या

मराठवाड्यातील मराठा समाजाला 29 मेपर्यंत कुणबी प्रमाणपत्र द्या सातारा, कोल्हापूर, औंध, मिरज संस्थानचा अध्यादेश काढा मराठा आंदोलकांवरील गुन्हे सरसकट मागे घ्या कुणबी प्रमाणपत्रांना तत्काळ व्हॅलिडिटी द्या मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करा स्वतंत्र कुणबी, मराठा मंत्रालय स्थापन करा. न्या. शिंदे समितीला मुदतवाढ द्या

### मुंबईत पुढील महिन्यात मराठा मंथन परिषद


मराठा समाजाला कायदेशीर आणि घटनात्मक प्रक्रियेचा अवलंब न करता एसईबीसी आरक्षण देणे कसे शक्य आहे, असा सवाल करत सर्वेच्च न्यायालयाने घातलेली 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यासाठी घटनादुरुस्तीची आवश्यकता असताना राज्य शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, असा आरोप मराठा क्रांती मोचार्चे राज्य समन्वयक नानासाहेब जावळे, रमेश केरे–पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. मराठा क्रांती मोर्चा आणि मराठा ठोक मोर्चातर्फे जून महिन्यात मुंबईत मराठा मंथन परिषद घेणार आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात रान पेटलं

## शेकडो कुटुंब आक्रमक, अनेक गावात तीव्र संताप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राजकीय नेत्यानंतर आता जनसामान्यांकडून शक्तीपीठ महामागार्ला विरोध केला जात आहे. या प्रकल्पामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शक्तिपीठ महामार्गामुळे महारापूराच्या धोक्याला शिक्कोमार्तब होईल, अशी चिंता शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी व्यक्त केली. राजू शेट्टी यांच्यानंतर आता महिलांनी या प्रकल्पाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे.

शक्तिपीठ महामार्गावरून समर्थनार्थ व विरोधी असे दोन गट पडले आहेत. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. महामार्गामुळे राज्यावर नऊ लाख कोटींचं कर्ज होणार आहे. त्यामुळे त्याचा भुर्दंड जनतेला सोसावा लागणार आहे, असं विरोधी पक्षाच्या नेत्यांचं म्हणणं आहे. या प्रकल्पाला सोलापूरनंतर सांगलीतूनही विरोध होताना दिसत आहे.




**शक्तिपीठाविरोधात महिला आक्रमक**

नागपूर–गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी गावातील २८६ एकर जमीन संपादित केली जणार आहे. या प्रसल्पावरून सांगलीच्या वाळवा तालुक्यातील कामेरी येथील महिलांनी आझ शनिवारी ग्रामपंचायतीपासून जनजागृती मोर्चा काढला. प्रकल्पाच्या विरोधात महिलांनी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान मोर्चा काढला. कामेरी येथून निघालेला त्यांचा मोर्चा हनुमान मंदिर, मुख्य बाजारपेठ मार्गे गावातून गेला.

महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. त्यानंतर मोर्चादरम्यान "एकच जिद्द, शक्तिपीठ रद्द", "शक्तीपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे", "जमिनी आमच्या हक्काच्या, नाही कुणाच्या बापाच्या", अशा घोषणाबाजी देत महिलांनी संपूर्ण कामेरी गाव दणाणून सोडले.

प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गासाठी कामेरी गावातील सुमारे 286 एकर बागायती आणि कसदार जमीन भूसंपादनात जाणार आहे. भाजीपाला, केळी, ऊस व इतर नगदी पिके घेणारी ही जमीन गेल्यास शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार असल्याने गावात तीव्र संताप आहे. 'आमची पिढ्यानपिढ्यांची जमीन आहे. ती आमच्या लेकराबाळांच्या भविष्याची शिदोरी आहे. ती आम्ही कदापि देणार नाही,' अशी भूमिका आंदोलक महिलांनी मांडली.

तत्पूर्वी, काही दिवसांपूर्वी शक्तिपीठ महामार्गाविरोधात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सोलापूर–पुणे राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि पोलिसांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. शक्तिपीठ महामार्गाला सोलापूर जिल्ह्यातील अरण मोडनिंब पंढरपूर माळशिरस या भागातील शेतकऱ्यांनी विरोध केलाय. शक्तिपीठ महामागार्ला विरोध म्हणून माढा तालुक्यातील अरण येथे सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनामध्ये शक्तिपीठ महामार्गामध्ये बाधित होणारी शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वीज कपातीचा शेतीसह दूध उत्पादनालाही फटका

## पशुपालकांच्या अडचणी वाढल्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरसह राज्यात वाढत्या उष्णतेमुळे भूगभार्तील पाण्याची पातळी झपाट्याने खालावत असून, त्यातच ग्रामीण भागातील वारंवार होणाऱ्या वीज भारनियमनामुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

उन्हाळी पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले असून, जनावरांच्या दुध उत्पादनावरही त्याचा परिणाम होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.यंदा उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून अनेक भागांमध्ये विहिरी, आड आणि बोअरवेल कोरड्या पडल्या आहेत. बागायतदार शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून शेततळ्यांमध्ये पाणीसाठा करून ठेवला असला, तरी ऐन उन्हाळ्यात होणाऱ्या वीज कपातीमुळे हे पाणी वेळेवर पिकांना देता येत नाही. परिणामी उभी पिके पाण्याअभावी होरपळून निघत आहेत.विशेषतः डाळिंब, ऊस, केळी यांसारख्या बागायती पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. पाणी उपलब्ध असूनही केवळ लोडशेडिंगमुळे सिंचन




करता येत नसल्याने पिके जगविणे कठीण झाले आहे. जनावरांसाठी घेतलेल्या चारा पिकांनाही पुरेसे पाणी देता येत नसल्याने पशुपालकांमध्येही चिंता वाढली आहे.

दरम्यान, सकाळच्या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने दूध काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या धारा मशीन बंद पडत आहेत. त्यामुळे अनेक पशुपालकांना हाताने दूध काढावे लागत असून त्याचा दूध उत्पादनावर परिणाम होत असल्याची तक्रार केली जात आहे.ग्रामीण भागातील वाढते लोडशेडिंग तातडीने कमी करून शेती आणि पशुपालनासाठी सुरळीत वीजपुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी आणि पशुपालकांकडून लोकप्रतिनिधी तसेच महावितरण प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील कोणत्याही पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीतून वगळू नये- एस. चोक्कलिंगम




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशासह महाराष्ट्र राज्यातही मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीची नोंद दुरुस्त करणे तसेच अपात्र नावे वगळणे असा आहे. तरी या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कातीर्केयन यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम आढावा प्रसंगी श्री. चोक्कलिंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, यांच्या सह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

# अक्कलकोट-कलबुर्गी महामार्गावर ट्रक आणि कारचा भीषण अपघात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट–कलबुर्गी महामार्गावर ट्रक आणि चारचाकी कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. अपघातात कार मधील 3 ते 4 प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. मात्र ट्रकमधील तांदूळ रस्त्यावर पडल्यानं नुकसान झालं आहे.

अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बुद्रुक येथील गावाजवळ हा अपघात झाला आहे. तांदळाच्या ट्रकने कारला धडक दिल्यानंतर ट्रक पलटी झाला आहे.

ट्रकमधील तांदळाचे पोते रस्त्यावर पडल्याचे पाहायला मिळाले. चारचाकी कारचे



देखील मोठे नुकसान झाले आहे. अक्कलकोट–कलबुर्गी महामार्गावर अपघातामुळे काही वेळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. दरम्यान जखमी प्रवाशांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर रस्त्यावर पडलेले तांदळाचे पोते आणि ट्रक बाजूला करण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरु आहेत.

### धावत्या एसटी बसची डिझेलची टाकी निकामी होऊन पडली, करमाळ्यात मोठी दुर्घटना टळली

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. एसटी बसची डिझेल टाकी निकामी होऊन खाली पडल्याची घटना घडली. धावत्या बसमध्ये डिझेल टाकी रस्त्यावरच पडली, मात्र, चालक आणि वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. करमाळा ते वाशिंबे मार्गावर धावणारी ही बस होती. करमाळा शहरात हा प्रकार घडला आहे.

### चालक व वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली

पेट्रोल डिझेलच्या इंधन बचतीची सर्वत्र चर्चा सुरू असताना, करमाळ्यात मात्र एसटी बसची डिझेल टाकी अचानक रस्त्यावर तुटून पडल्याची घटना घडली आहे. एसटी बस रस्त्यावर धावत असताना बसची डिझेल टाकी निकामी होऊन पडली. करमाळा ते वाशिंबे मार्गावर धावणाऱ्या बस सोबत करमाळा शहरात हा प्रकार घडला. बसची डिझेल टाकी खाली पडल्याचे लक्षात आल्यावर तात्काळ बस चालकाने बस थांबवली. प्रवाशांना बसच्या खाली उतरवले. बसच्या चालक व वाहकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना व जीवितहानी टळली आहे.

संपादकीय

# राजकीय यश, आर्थिक अपयश!

आर्थिक वाढीचे आकडे कुटूनही, कसेही पाहिले तरी, 'सर्वाधिक वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था' असे भारताने स्वतःला म्हणवून घेणे किती पोकळ आहे याची खात्री पटते. आपल्या आर्थिक धोरणांची दिशा चुकते आहे आणि आर्थिक वाटचालही मंदावते आहे, हे निव्वळ राजकीय यशाच्या झपाट्यापुढे या सरकारच्या लक्षातच येत नाही काय?

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकांमधील विजय हा भाजपच्या राजकीय कामगिरीचा सर्वोच्च बिंदू नाही तर त्याचे ऐतिहासिक यशदेखील आहे. २०२९ मध्ये नरेंद्र मोदींना प्रचंड जनादेश मिळणे हा भाजपसाठी पश्चिम बंगालमध्ये गाठलेला आपला सध्याचा सर्वोच्च निवडणूक-यश-बिंदू ओलांडून पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे. त्याच वेळी, अर्थव्यवस्थेच्या हाताळणीच्या बाबतीत भाजपने नीचांक गाठला असून, परिस्थिती याहूनही अधिक खालावणार नाही याची कोणतीही खात्री देता येत नाही. या संदर्भातील ज्वलंत प्रश्न असा आहे की, या दोन्ही घटना केवळ योगायोगाने घडल्या आहेत की त्या एकाच वेळी आणि परस्परांशी निगडित अशा प्रकारे निश्चित झाल्या आहेत? याचे उत्तर दुसरे म्हणजेच त्या परस्परांशी निगडित आहेत हे आहे. ते कसे, याचे स्पष्टीकरण लेखाच्या ओघात मिळेलच. आपल्या आर्थिक घसरणीला चार घटक जबाबदार आहेत. त्यातला पहिला आणि सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे स्वतः सरकार. सरकारला समस्या माहीत आहे, पण आर्थिक संकटासाठी इतरांना दोष देण्यातच ते समाधानी आहे. दुसरा घटक आहे महत्त्वाचे उद्योग. तिसरा काँग्रेस पक्ष. तो गांधी घराण्याच्या नेतृत्वाखाली इतका निवांत आहे की भाजपच्या एकपक्षीय लोकशाही राजवटीखेरीज गत्यंतरच उरू नये! चौथा घटक म्हणजे पहिल्या तिघांना पडद्यामागून नियंत्रित करणारा सूत्रधार, अर्थात 'डीप स्टेट'. त्यातच आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक वेगाने विस्तारत असल्याचा दावा अभिमानाने केला जाण्याइतपत पुरेसे आकडे दिसतात, त्यामुळे हे संकट अधिक गंभीर आहे.

पश्चिम बंगालमधील दणदणीत विजय आणि भारतात जवळपास एकपक्षीय लोकशाही वर्चस्व यातून भाजपच्या राजकीय यशाची पातळी स्पष्ट होते. त्यामुळे काही जणांना 'आर्थिक अधोगती' ही संज्ञा कदाचित अतिशयोक्तीची वाटू शकते. भारताची अर्थव्यवस्था ही जिचा वाढदर (जीडीपी अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादनातील वार्षिक वाढीचा टक्का), गेल्या ३५ वर्षांच्या ऐतिहासिक सरासरीइतका, म्हणजेच वर्षाला सहा टक्के इतका आहे, अशी जगातील सर्वात वेगाने वाढणारी 'प्रमुख' अर्थव्यवस्था नाही का, असा प्रश्नही पडू शकतो. यातील खरी मेख 'प्रमुख' या शब्दामध्ये आणि ३५ वर्षांच्या सरासरीच्या निकषावर केलेल्या मोजमापामध्ये दडलेली आहे. भाजपच्या २०१४ पासूनच्या राजवटीत नेमकी किती वाढ झाली, हे सन १९९१ पासूनच्या '३५ वर्षां'च्या हिशेबात शिताफीने दडवले जाते. आजघडीला जीडीपी वाढीच्या बाबतीत भारताचा क्रमांक नववा लागतो; दरडोई जीडीपी वाढीच्या बाबतीत हा क्रमांक आठवा आहे; आणि जीडीपीतील दरडोई वाढ जर अमेरिकी डॉलरमध्ये मोजली तर भारत आज जगात १६ व्या स्थानावर आहे. अमेरिकी डॉलरमधील दरडोई सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीच्या निकषावर बांगलादेश पहिल्या क्रमांकावर असून, त्याची सरासरी दरडोई वाढ वर्षाला ८.३ टक्के इतकी आहे. इथिओपिया ७.२ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे, तर भारत केवळ ४.७ टक्के इतक्याच वाढीपायी १६ व्या क्रमांकावर आहे. या आकडेवारीचे विश्लेषण कोणत्याही प्रकारे केले तरी 'सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था' ही बढाई आता थांबवून शहाणे होण्याची वेळ आली आहे, हेच लक्षात येते.

भारत २०१३ मध्ये जगातील पाच 'अस्थिर अर्थव्यवस्थां'पैकी (फ्रॅजाइल फाइव्ह) एक होता, त्याची स्थिती आता कदाचित केवळ दोन अस्थिर अर्थव्यवस्थांपैकी एक बनण्यापर्यंत (दुसरा देश तुर्की) पोहोचली आहे. भारतीय रुपयाचे अमेरिकी डॉलरच्या तुलनेतील मूल्य गेल्या वर्षभरात सुमारे १२ टक्क्यांनी घसरले. हे घसरणीचे सलग सातवे वर्ष असून, 'आशियातील सर्वात खराब कामगिरी करणाऱ्या चलनां'मध्ये भारतीय रुपयाचा समावेश २०२५ सालापासूनच झालेला आहे.

तरीही आज भारताच्या आर्थिक स्थितीमध्ये एक विरोधाभास दिसतो. तो असा की महागाई 'नियंत्रणात' आहे, चालू खात्यातील तूट 'नियंत्रणात' आहे, आर्थिक वाढ 'स्थिर' आहे आणि राजकीय स्थैर्य तर अभूतपूर्व म्हणावे इतके भक्कम आहे. सैद्धांतिकदृष्ट्या, या 'स्थिर' आणि 'नियंत्रणाखालील' परिस्थितीमुळे अस्थिरतेला खतपाणी मिळायला नको, उलट चलनाविषयीचा विश्वास बळकट व्हायला हवा. पण तसे का होत नाही?

भारतीय तसेच परदेशी गुंतवणूकदारांनी भारतात अधिक गुंतवणूक करावी यासाठी आवश्यक शस्त्रक्रिया करण्याऐवजी, सरकारने केवळ तात्पुरती मलमपट्टी केली आहे. भारतीयांना देशातच अधिक गुंतवणूक करण्याचे आवाहन, हे त्यापैकीच. देशातील गुंतवणुकीतून काढता पाय घेण्याच्या आपल्या कृतीतून गुंतवणूकदार त्यांना काय म्हणायचे असते ते म्हणतच असतात, हे फार पूर्वीच सिद्ध झाले आहे. व्यक्ती तसेच कंपन्या नैतिक आवाहनांना किंवा सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने जे राष्ट्रीय हित असते त्याला नाही, तर आर्थिक लाभाच्या शक्यतांना प्रतिसाद देतात. आणि आजच्या गुंतवणूकदारांसाठी भारत सोडून जाणे किंवा भारतात गुंतवणूकच न करणे हीच आर्थिक लाभाची शक्यता किंवा 'प्रोत्साहन' (इन्सेन्टिव्ह) ठरले आहे. असे का? तर नव्या गुंतवणूकदारांसाठी भारतातील 'व्यावसायिक वातावरण' हे भारतात गुंतवणूक न करण्यासाठीचे बहुचर्चित कारण आहे. दुसरीकडे भारतीय गुंतवणूकदार कंपन्यांना इथल्या सरकारी धोरणाबाबत निश्चित वाटणे दूरच, त्यांना उलट धोरण धरसोडीबद्दल चिंताच वाटत असेल.

परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) हा कोणत्याही देशाच्या जीडीपी वाढीचा, निर्यातीचा आणि उत्पादक क्षेत्राच्या जागतिक स्पर्धेचा मुख्य पाया आहे. ही गुंतवणूक देशात प्रगत तंत्रज्ञान, भांडवल आणि जागतिक पुरवठा साखळ्यांशी जोडणी घेऊन येते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा विकास होतो. थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण जितके जास्त, तितकी गुंतवणूक जास्त आणि परिणामी आर्थिक वाढही जास्त ही बाब जगभरात सर्वमान्य आहे आणि २०१५ पर्यंत भारतातही ती स्वीकारली जात होती. मात्र नव्या विचारसरणीनुसार असे मानले जाते की, भारताच्या 'विशाल' बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी प्रत्येक 'आतुर' असलेल्या परकीय गुंतवणूकदाराने भारताने आपल्या अटींवर भारतात प्रवेश दिला पाहिजे आणि तसे करणे शक्यही आहे. या बाजारपेठेच्या व्याप्तीचा अंदाज घेण्यासाठी एक संदर्भ पाहू या. २०१५ मध्ये भारताचा जीडीपी हा अमेरिकेतील 'कॅलिफोर्निया' या एका राज्याच्या जीडीपीपेक्षाही कमी होता. याच विचारसरणीमुळे २०१५ मध्ये 'द्विपक्षीय गुंतवणूक करारां'च्या (बायलॅटरल इन्व्हेस्टमेंट ट्रीटी- 'बीआयटी') आराखड्यात आमूलाग्र बदल करण्यात आले असावेत, अशी शक्यता वर्तवली जाते. त्यानंतर लगोलग, 'गुणवत्ता नियंत्रण आदेशां'ची (क्वालिटी कंट्रोल ऑर्डर्स किंवा 'क्यूसीओ') संख्या वाढली. या आदेशांची संख्या सन २०१७ मध्ये केवळ १४ होती; ती डिसेंबर २०२४ पर्यंत वाढून ७६५ वर गेली. या असल्या 'गुणवत्ता नियंत्रणा'तून, देशांतर्गत विशेषतः परकीय कंपन्यांशी भागीदारी असलेल्या उद्योगसंस्थांना संरक्षण देण्यासाठीचे आणखी एक साधन, यापलीकडे काहीही साध्य झालेले नाही.

'द्विपक्षीय गुंतवणूक करारा'च्या (बीआयटी) मसुद्यात २०१५ मध्येच सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार, एखाद्या परदेशी गुंतवणूकदाराने आपला भारतीय प्रकल्प सोडून बाहेर पडण्यापूर्वी, लवादाकडे जाण्यासाठी पाच वर्षे वाट पाहणे अनिवार्य करण्यात आले. तसेच सदर लवाद प्रक्रिया एखाद्या भारतीय न्यायाधीशासमोरच पार पडावी, अशीही अट घालण्यात आली होती. मुळात जिथे भारतीय नागरिकसुद्धा (विषय किंवा तक्रार कोणतीही असली तरी) भारतीय न्यायालयांमध्ये जायला कचरतात, तिथे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय न्यायाधीशांकडूनच न्याय मिळवायला हवा ही सक्ती करण्यात काय हशील आहे?

परदेशी गुंतवणूकदारांनी आंतरराष्ट्रीय लवादाकडे जाण्यापूर्वी पाच वर्षे फक्त स्थानिक कायदेशीर उपाययोजनांवरच भिस्त ठेवण्याची सक्ती, ही तरतूद सर्वात हानीकारक ठरल्याचे दिसून येते. आजवरच्या इतिहासात, कोणत्याही प्रकारच्या भागीदारीशी संबंधित एखाद्या करारातून किंवा निर्णयामधून कायदेशीररीत्या मागे हटण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी पाच वर्षे एवढा मोठा कालावधी दिला गेला आहे का? आजही, सरकारने ज्या सुधारणा करण्याचे आश्वासन दिले आहे, त्यात मुळातल्या त्रुटींचा पुनर्विचार करण्याऐवजी केवळ त्या सौम्य करण्याचाच उद्देश असल्याचे दिसते.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये संसदेत घोषणा केली होती की, द्विपक्षीय गुंतवणूक कराराच्या आराखड्याचा आढावा घेतला जाईल आणि तो सुधारून प्रसिद्ध केला जाईल. या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन कधी होणार ते कोणालाच माहीत नाही. वाट बघण्याचा पाच वर्षांचा कालावधी कमी करून तो 'फक्त' तीन वर्षांवर आणणे हा एकच अपवाद वगळता संबंधित आराखड्याच्या मूळ रचनेत कोणताही बदल झालेला नाही, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पण या द्विपक्षीय गुंतवणूक करारातल्या परकीय गुंतवणूकदारानेही भारतीय न्यायालयांमधील कायदेशीर प्रक्रिया सर्वप्रथम पूर्ण करणे ही अट तर २०१५ पूर्वी कधीच नव्हती, ती मात्र कायमच ठेवली जाण्याची शक्यता आहे.

प्रचंड राजकीय यश मिळत गेले की आपण आखलेली धोरणे चांगलीच असणार, अशी खात्री वाटू लागते. असे वाटणे हा खरे तर अधिक मोठा धोका असतो. कारण वस्तुस्थिती पार निराळी असते. भारतात अजूनही स्थैर्य आहे, इथे खूप मोठी बाजारपेठ आहे आणि या दोन्हीमुळे जागतिक पातळीवर आपण गैरलागू ठरलेलो नाही, याचे फायदे भारताला निश्चितपणे मिळू शकतात. सध्याचे पश्चिम आशियाई संकट ही देशातील आर्थिक सुधारणांसाठी एक अत्यंत अनुकूल परिस्थिती आहे. सरकारने तिचा उपयोग गुंतवणुकीचे वातावरण सुधारण्यासाठी, करारांची विश्वासार्हता पुन्हा निर्माण करण्यासाठी आणि सुधारणांबाबत आपण गंभीर आहोत, हे दाखवण्यासाठी केला पाहिजे. तसे झाले नाही तर सरकारचे राजकीय वर्चस्व हे त्याचे सामर्थ्य वाटणार नाही, तर सामर्थ्याचा निव्वळ डोलारा वाटू लागेल.

निवडणुका सत्ता मिळवून देऊ शकतात, पण समृद्धी येऊ शकते ती केवळ योग्य धोरणांच्याच माध्यमातून. त्या संदर्भात आपण काय करतो याकडे यापुढच्या काळात जगाचे लक्ष असेल.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायांमुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थमाकीलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे.

ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.

मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.

भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थमाकील साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.

शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.

महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.

आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.

पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

भारतीय संस्कृतीत निसगार्ला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.

समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे 'वापरा आणि फेका' ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.

प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर केला जातो. लग्नसमारंभ, जत्रा, उत्सव आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये डिस्पोजेबल प्लेट्स, कप आणि पाण्याच्या बाटल्यांचा वापर होतो. या कार्यक्रमांमध्ये पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पत्रावळी, स्टीलची भांडी आणि पुनर्वापर करता येणारे साहित्य वापरण्याची चळवळ सुरू झाली आहे. अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

पर्यटन क्षेत्रातही प्लास्टिक प्रदूषण मोठी समस्या बनली आहे. डोंगराळ भाग, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. पर्यटनस्थळांवर प्लास्टिक नेण्यावर निर्बंध आणणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि पर्यटकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. निसर्गरम्य स्थळांचे सौंदर्य टिकवण्यासाठी प्लास्टिकमुक्त पर्यटन ही काळाची गरज आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे. प्लास्टिकमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शेती उत्पादनावरही परिणाम होतो. प्लास्टिक कचऱ्यामुळे पाण्याचे स्रोत दूषित होतात. ग्रामीण भागात जैविक शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन प्लास्टिक वापर कमी करता येऊ शकतो. शेतकरी संघटना आणि कृषी विभागांनी या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे.

आज अनेक संशोधक प्लास्टिकला पर्याय शोधण्याचे काम करत आहेत. मका, ऊस, बटाटा स्टार्च आणि समुद्री वनस्पतींपासून जैवविघटनशील पदार्थ तयार केले जात आहेत. हे पदार्थ पर्यावरणात सहज विघटित होतात. तथापि, अशा पर्यायांचा खर्च अजूनही तुलनेने अधिक आहे. सरकारने संशोधनाला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक उद्योगांना मदत केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरू शकते. कापडी पिशव्या, स्टीलच्या बाटल्या आणि टिकाऊ वस्तू दीर्घकाळ वापरता येतात. त्यामुळे वारंवार नवीन वस्तू खरेदी करण्याची गरज राहत नाही. स्थानिक कारागीर आणि लघुउद्योगांनाही यामुळे रोजगार मिळू शकतो.

निसर्ग आणि मानव यांचे नाते परस्परावलंबी आहे. पर्यावरणाचे नुकसान म्हणजे शेवटी मानवाचेच नुकसान होय. पृथ्वीवरील संसाधने मर्यादित आहेत. आपण आज केलेल्या चुका भविष्यातील पिढ्यांना भोगाव्या लागू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही आजची मोठी गरज आहे.

प्लास्टिक प्रदूषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्य आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्था प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अनेक देश एकत्र येऊन जागतिक करार करण्याच्या दिशेने काम करत आहेत. समुद्रातील प्लास्टिक कमी करण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. तथापि, या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण दैनंदिन जीवनात किती प्लास्टिक वापरतो, त्याचे पर्यावरणावर काय परिणाम होतात आणि आपण त्यात कसा बदल करू शकतो याचा विचार करण्याची ही वेळ आहे. केवळ एका दिवसापुरती जनजागृती न करता ती वर्षभर सातत्याने टिकवणे आवश्यक आहे.

आजच्या काळात मुलांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना प्लास्टिकचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. घरात आणि शाळेत पर्यावरणपूरक सवयी लावल्या पाहिजेत. मुलांनी स्वतः प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा संकल्प केला तर भविष्यात समाजात मोठा बदल घडू शकतो.

प्लास्टिकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने पर्यावरण विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचवता येते. यशस्वी उपक्रमांची उदाहरणे समाजासमोर मांडल्यास इतरांनाही प्रेरणा मिळते.

अनेक गावांनी आणि शहरांनी प्लास्टिकमुक्त होण्याचा आदर्श निर्माण केला आहे. काही गावांमध्ये प्लास्टिक पिशव्यांवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कापडी पिशव्यांचा वापर सुरू केला आहे. काही शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाच्या आधुनिक पद्धती वापरल्या जात आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा प्रसार होणे गरजेचे आहे.

आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देणे धोकादायक आहे. विकासाचा खरा अर्थ म्हणजे मानवाचे जीवनमान सुधारताना पर्यावरणाचे रक्षण करणे होय. जर पृथ्वीच सुरक्षित राहिली नाही तर कोणताही विकास निरर्थक ठरेल. म्हणूनच प्लास्टिकमुक्त पृथ्वी ही केवळ पर्यावरणवाद्यांची कल्पना नसून मानवाच्या अस्तित्वाशी निगडित गरज आहे.

आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. 'रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल' या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा आपल्याला पर्यावरणाशी असलेले आपले नाते पुन्हा दृढ करण्याची प्रेरणा देतो. पृथ्वी ही आपली सामायिक संपत्ती आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे म्हणजे निसगार्शी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न होय.

आज जर आपण सजग झालो नाही तर भविष्यातील पिढ्यांना प्रदूषित पृथ्वी वारसा म्हणून मिळेल. नद्या, समुद्र, जंगल आणि हवा यांचे संरक्षण करण्यासाठी प्लास्टिकमुक्त समाजाची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून आपण पृथ्वीचे सौंदर्य आणि संतुलन जपू शकतो.

या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

वात्रटिका

## पैशाची मनीषा

एक दोन नाही एकदम
तीन तीन आहेत मनीषा...
कुठे जाऊन बसल्यात
याच आशा आणि मनीषा...
मोठे होते राज पण शिव शिव
सभ्यतेचा बुरखा फाटला...
निघाला नाही तसा, जसा
दिसला आणि वाटला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** कै.नामदेवराव जगताप न. प. उर्दू शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल शाळेतील विद्यार्थीनींचा मुस्लिम विकास परिषदेतर्फे उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक प्रतीजा वेदपाठक यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक इकरा मजहर शेख, व्दितीय क्रमांक शाहीस्ता सत्तार शेख, तृतीय क्रमांक जारा मुनाफ कुरेशी या गुणवंत विद्यार्थीनींचा सन्मान करण्यात आला. यावेळी उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, इंग्रजीचे शिक्षक इब्राहिम मुजावर तसेच हाज यात्रेसाठी मुन्ना सय्यद यांचा ही सन्मान मुस्लिम विकास परिषदेचे अध्यक्ष फारुक जमादार, जहांगीर बेग,न्यु इरा इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अजीम मोगल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर शेख, बकशभई शेख, जमीर शेख, आझाद शेख जिशान कबीर, सुहास आगलावे, जुबेर सय्यद, पत्रकार अशपाक सय्यद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ वेदपाठक म्हणाले की, मुलींनी पुढे उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर, वकील, इंजिनिअर, अधिकारी होऊन उच्च पदावर जावे. मुलगी ही दोन घरांचा दिवा लावणारी आहे. मुलींनी शिक्षण घेऊन सुशिक्षित बनावे व अभ्यासू व्हावे तसेच ज्ञान प्राप्त करून एक प्रकारे समाजाची सेवा करावी असे ते यावेळी म्हणाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरबाज बेग,असीम बेग,समीर शेख, शाहरुख शेख,शाहीद बेग जावेद शेख आलीम खान जुबेर सय्यद आदींनी परिश्रम घेतले तसेच सर्वांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# पंढरपुर शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी - प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अधिकमास निमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक पंढरपूरात येतात. शहरातील वाहतुक कोंडीमुळे नागरिकांना तसेच येणाऱ्या भाविकांना रहदारीच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाहतुक कोंडी टाळण्यासाठी अवजड वाहने बाह्यवळणाने जातील याची दक्षता घेवून, शहरातील रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सुचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



अधिकमास निमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, टी.वाय. मुजावर, मंदीर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेवून, भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी जादा पोलीस बंदोबस्त नेमावा. शहरातील नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत. मंदीर परिसर, प्रदक्षिणा मार्ग येथील अतिक्रमण मोहिम सुरु ठेवावी. वाळवंटात फिरते विक्रेते, वाहने प्रवेश करणार नाहीत याची दक्षता घेवून आवश्यक उपाय योजना कराव्यात. शहरातील अनाधिकृत होर्डींग तात्काळ काढावेत तसेच आचारसंहिता लागू झाल्याने राजकीय होर्डींग तात्काळ काढावेत अशा सूचना प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

यावेळी सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे म्हणाले, अधिकमास निमित्त दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेवून भाविकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. तसेच भाविकांना फिरते विक्रेत्यांचा व अतिक्रमणाचा त्रास होऊ नये यासाठी शहरात नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने मोहिम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

अधिकमास कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदीर समिती मार्फत आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, भाविकांना दर्शन रांग, दर्शन मंडप येथे मॅट,पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष, शौचालय, स्वच्छता, वैद्यकीय उपचार आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. दर्शन रांगेतील भाविकांचे सुलभ व जलद दर्शन प्राधान्य दिले असून, दर्शनरांगेत घुसखोरी होऊ यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे. भाविकांसाठी दर्शनरांगेत स्प्रिंकलर बसविण्यात आले आहेत. तसेच भाविकांच्या सुविधेसाठी स्वंयसेवक, कंत्राटी कर्मचारी, मंदीर समिती कर्मचारी अशा एकूण 1200 कर्मचारी व स्वयंसेवाची नेमणूक केली असल्याचे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

यावेळी अधिकमास कालावधीत पंढरपूर नगर पालिका प्रशासनाकडून आरोग्य, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, अतिक्रमण मोहिम आदी बाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी यावेळी दिली.

# टेंभुर्णीत छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक संपन्न



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी येथील छावा चौकात उभारण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य स्मारक परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण टेंभुर्णी नगरी भगव्यमय झाली होती.

जयंतीनिमित्त १४ मे रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान करून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अनोखे अभिवादन केले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. त्यानंतर २० मे रोजी संध्याकाळी सात वाजता छावा चौकातून भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करून मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले.

या मिरवणुकीत आकर्षक छत्रपती संभाजी महाराज यांची भव्य दिव्य मूर्ती हे सर्वांचे लक्ष मधून घेत होती ढोल-ताशा पथके, भगवे ध्वज, पारंपरिक वेशभूषा आणि महाराजांच्या पराक्रमाचे दर्शन घडविणारे जिवंत देखावे हे विशेष आकर्षण ठरले. छत्रपती संभाजी महाराजांचा जिवंत देखावा पाहण्यासाठी शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. तो देखावा पाहताना अनेकांच्या अंगावर शहारे येत होते.

'जय भवानी, जय शिवाजी', 'धर्मवीर संभाजी महाराज की जय' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. टेंभुर्णी व परिसरातील हजारो शिवभक्तांनी मिरवणुकीत सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मिरवणूक शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# बकरी ईद सण शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** बकरी ईद हा सण दि. 27 मे 2026 रोजी साजरा होत असून दि. 27 ते दि. 29 मे 2026 या कालावधीत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनावरांची खरेदी-विक्री होणार आहे. यासाठी बाजार भरविण्यात येणार असून जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी म्हटले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बकरी ईद 2026 निमित्त महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा 1976 व महाराष्ट्र प्रार्य रक्षण सुधारणा कायदा 1995 च्या अमलबजावणीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत निवासी जिल्हाधिकारी पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. अनिल तांबे, जिल्हा




नियोजन अधिकारी दिलीप पवार, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अत्तिक मुलानी, महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी तपन डंके, पशुसंवर्धन चे डॉ. डी. ए. गिड्डे, सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी हबीब भाई नदाफ, हाजी कुरेशी, इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

पाटील पुढे म्हणाले की सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या सूचना तसेच पशुसंवर्धन विभाग व महापालिकेच्या वतीने बकरी ईद निमित्त केलेल्या तयारी प्रमाणे परस्परात समन्वय ठेवून ईद शांततेत पार पडेल या दृष्टीने प्रयत्न केले जातील व सर्व मुस्लिम धर्मीय सामाजिक संघटनांनी प्रशासनालाही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जनावरांची अवैध कत्तल व अवैध वाहतूक रोखण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलिस विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी. ईद सणाच्या काळात मार्गदर्शक सूचना व शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असून कायदा व स्वास्थ्य तपासणी बाबत राहणाऱ्या त्रुटीचे निराकरण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी डंके यांनी बकरी ईद निमित्त लहान मोठ्या जनावरांची कुर्बानी देण्यासाठी फॉरेस्ट मटन मार्केट येथे व्यवस्था करण्यात आली असून पाण्याचे टँकरही उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले.

जिल्हा उपयुक्त पशुसंवर्धन डॉक्टर तांबे म्हणाले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) कायदा, 1995 अंतर्गत गाय, वळू, बैल यांच्या कत्तलीस व वाहतुकीस बंदी आहे. जनावरांची वाहतूक करत असताना जनावरांची वाहतूक अधिनियम, 2001 मधील नियम क्र.16 नुसार वाहतूक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, 1960 व वाहतूक अधिनियम 1978 मधील नियम 47 नुसार जनावरांची स्वास्थ्य तपासणी करून न्यायालयीन प्रेषण आवश्यक आहे. ईद सणाच्या वाहतूक करत असताना प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, 1960 मधील वाहतूक नियमांमधील तसेच पशुसंवर्धन विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य बुऱ्हाण यांनी छोट्या बकऱ्यांना घरीच कुर्बानी देण्याची परवानगी प्रशासनाकडे मागितली. देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपण शांततेत सण साजरा करण्याचे त्यांनी आवाहन केले. तसेच हसीफ भाई नदाफ यांनी सोलापूर महापालिकेने मोठ्या जनावर साठी पुढील काळात त्वरित आधुनिक कत्तलखाना निर्माण करण्याची मागणी केली. तसेच अन्य सदस्यांनी बकरी ईद सण शांततेत साजरा करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

# सोलापूर जिल्ह्यात विधान परिषद निवडणुकीसाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणूकचा कार्यक्रम 18 मे 2026 रोजी जाहीर झालेला आहे.

या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात निवडणूक कामकाजासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या आदेशान्वये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणुकीदरम्यान सर्व कामकाज पारदर्शक व सुरळीत पार पडावे यासाठी आवश्यक ती जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्या जबाबदारीची सविस्तर माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पाटील यांनी देऊन सर्व नोडल अधिकाऱ्यांनी परस्परात समन्वय ठेवून काटेकोरपणे कामे करावीत, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित विधान परिषद निवडणूक नोडल अधिकारी आढावा बैठकीत श्री. पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, पोलीस उपयुक्त अश्विनी पाटील, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विना पवार, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका योगेश डोके, जिल्हा विज्ञान व सूचना अधिकारी रवी पवार, तहसीलदार दिनेश पारगे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

निवडणुकीदरम्यान मनुष्यबळ व्यवस्थापन, प्रशिक्षण, साहित्य, वाहतूक, सायबर सुरक्षा, रशएएढ योजना, कायदा व सुव्यवस्था, आचारसंहिता पालन, खर्च निरीक्षण, मतपत्रिका व पोस्टल बॅलेट, माध्यम व्यवस्थापन, तक्रार निवारण, निरीक्षक समन्वय, दिव्यांग मतदार सुविधा, एएमएफ, स्ट्राँग रूम व मतमोजणी केंद्र, सीमा व्यवस्थापन, दारू नियंत्रण, अन्न व्यवस्थापन, वन विंडो प्रणाली, जिल्हा नियंत्रण केंद्र, सूक्ष्म निरीक्षक, सोशल मीडिया निरीक्षण व वैद्यकीय सुविधा अशा 28 क्षेत्रांसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत, असे श्री. पाटील यांनी सांगून सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना दिलेल्या जबाबदाऱ्याची माहिती दिली.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत फिनिक्स स्कूलचे घवघवीत यश



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** गोवा पणजी येथे नुकत्याच पार पडलेल्या, राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील लवंग २५/४ येथील फिनिक्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत आपल्या बुद्धिमत्ता,वेग आणि अचूकतेची चमक दाखवली.

या स्पर्धेसाठी देशभरातून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते.या स्पर्धकांमध्ये फिनिक्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध गटांमध्ये चॅम्पियन किताब व विशेष प्राविण्य पुरस्कार पटकावले.यामध्ये अवघ्या पाच वर्षाच्या अदिती सोमनाथ चव्हाण व गुरुराज अमोल कोळेकर यांनी आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेची झलक दाखवत सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले.केवळ दहा मिनिटांत २०० गणिते सोडविण्याचे आव्हान असताना अदिती ने अवघ्या ६ मिनिटे ४ सेकंदांत व गुरुराज ने ६ मिनिटे ७ सेकंदात २०० गणिते अचूक आणि अतिशय जलद गतीने सोडवून 'चॅम्पियन' हा मानाचा किताब पटकावला.तर तस्मिया सत्तार शेख हिने ६.२० सेकंदात अचूक दोनशे गणिते सोडवून चॅम्पियन ऑफ चॅम्पियन पुरस्कार मिळविला तर आयशा हमीद कोरबु ६.२५ सेकंद,विश्वपरी दशरथ दगडे ६.२७ मिनिटात अचूक गणिते सोडवून चॅम्पियन हा किताब मिळविला तर वल्लभ महादेव कोळेकर,सोहम समाधान जगताप यांनी ७ मिनिट १० सेकंदात २०० अचूक गणिते सोडवून प्रथम श्रेणीत स्थान मिळविले.या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी गोव्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,क्रीडा मंत्री, चॅम्प अबॅकसचे संचालक विशाल माने, स्नेहल माने,फिनिक्स स्कूल संस्थापक अध्यक्षा नूरजहाँ शेख, अमोल कोळेकर,सोमनाथ चव्हाण महादेव कोळेकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे पालक,शिक्षक आणि संपूर्ण परिसरातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

विद्यार्थ्यांची मेहनत,नियमित सराव आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळेच हे अभूतपूर्व यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. फिनिक्स स्कूल विद्यार्थ्यांच्या कामगिरीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांनी शाळेचा व गावाचा नावलौकिक उंचावला आहे.असे मत शाळेच्या संस्थापक अध्यक्षा नूरजहाँ शेख यांनी व्यक्त केले.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.

**9420766666**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**उमेश माने**
मो. 9353370779

**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) विचार विनिमय, सल्ला **** २) फुलांची माला, पराभव ३) धान्याचा ढीग ४) एक म्हण-**** *** गुडघ्याला बाशिंग ५) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ६) आ. बच्चू कडू यांची संघटना ७) नगर, सिटी ९) महिना १२) पानाचा विडा रंगण्यासाठी त्यामध्ये हा वापरतात १४) सहा गुणिले दोन १६) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट ** १७) कॉलनी (मराठीत) १८) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २१) दुर्लक्ष, आबाळ २२) पती २३) अभिनेत्री असलेली रमेश देव यांची पत्नी २६) लगेच, तात्काळ २७) चांगलाच्या विरूध्दार्थी २९) पूर्वी बांधले जाणारे चिरेबंदी चौसोपी निवासस्थान ३०) गाईचे पिल्लू ३१) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ३२) स्वर्गच्या विरूध्दार्थी ३४) भित्रा, घाबरट ३५) एक दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन ३८) उष्ण, तप्त ३९) भरावासाठी वापरले जाणारे दगड, मुरूम इत्यादी ४१) चिंतन ४३) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ४५) सल उलट लिहा

**आडवे शब्द :** १) आपले राज्य ४) सर्वाधिक खासदार या राज्यातून निवडले जातात ८) श्रेष्ठ, वरचढ ९) आई १०) तीन दुणे ११) एक शिवकालीन घोषणा- ** हर महादेव १२) ससा आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे १३) राजाचा सभामंडप १५) दोहोंतील अंतर, भेद १९) पृथ्वी, पातळ कालवण २०) भारताचे यापूर्वीचे पंतप्रधान-***** सिंह २३) श्रीरामाची पत्नी २४) बसपाचे निवडणूक चिन्ह २५) महाराष्ट्रातील या जिल्ह्याच्या नावामध्ये काना, माला, वेलांटी काही नाही २६) भाकरी थापण्याचे गोलाकार पात्र २७) वायू, पवन २८) शिरा २९) पाचगणीला जाताना या शहरातून जावे लागते, सातारा जिल्ह्यातील या ठिकाणचे महागणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे ३०) इंग्रजी मुळाक्षरातील शेवटून दुसरे अक्षर ३१) एक भारतीय फलंदाज-शिखर *** ३३) आकाशातील विजांचा चमकताना होणारा आवाज ३६) सर्व (हिंदीत) ३७) कडक नसलेले, मऊ ३८) आकाशात उंच भरारी घेणारा पक्षी ४०) हिंमत ४२) खांब ४३) पलीकडे, पल्याड ४४) ताकदवान ४६) पाच वजा चार ४७) जखमेवर लावतात तो ४८) रूची, आवड, फळातील द्रव ४९) पाच आणि चार मिळून होणारी संख्या

## सुडोकु - 258

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | 9 | 5 | | | | |
| 2 | | | 6 | 7 | | 5 | 8 | |
| | | 5 | | 1 | | 4 | | |
| 1 | 9 | | | 6 | 3 | 2 | | 5 |
| | 4 | | | | | 6 | | |
| 5 | 6 | 8 | 2 | | 7 | | | |
| | 2 | | | 8 | 1 | 3 | | |
| | | 1 | | | 9 | 7 | 6 | |
| | 7 | | 5 | 2 | | 8 | | 9 |

# मंत्री पीयूष गोयल यांनी घेतली खा. मोहिते पाटील यांच्या पाठपुराव्याची दखल



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** इराण-इस्रायल-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर होर्मुज संकटामुळे निर्यातदार, शेतकरी व व्यापार क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांच्या पार्श्वभूमीवर खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केंद्र सरकारकडे तातडीने उपाययोजनांची मागणी केली होती.त्यास प्रतिसाद देत केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी पत्राद्वारे माहिती दिली असून केंद्र सरकारने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत विविध मंत्रालयांच्या समन्वयातून तातडीच्या उपाययोजना सुरू केल्याचे नमूद केले आहे.

यामध्ये

१) निर्यात व ट्रान्सशिपमेंट सुलभता
२) प्रभावित खेपांसाठी शुल्क सवलती
३) पर्यायी मार्गांची उपलब्धता
४) RoDTEP दरवाढ
५) ECGC मार्फत मदत
६) खराब होणाऱ्या कृषी मालासाठी विशेष उपाययोजना
७) ग्रीन कॉरिडॉर व समर्पित शिपिंग व्यवस्था

यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे. शेतकरी, निर्यातदार आणि व्यापार क्षेत्राच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचे प्रयत्न निश्चितच दिलासादायक ठरत आहेत.

# अन्नछत्र मंडळाचे उत्कृष्ट व्यवस्थापन - न्यायमूर्ती रणजीतसिंह भोसले




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्कृष्ट व्यवस्थापन होत असल्याचे मनोगत उच्च न्यायालय मुंबई, कोल्हापूर खंडपीठाचे न्यायमूर्ती रणजीतसिंह भोसले यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोटचे दिवाणी न्यायाधीश मुकुल कल्याणकर, अक्कलकोट न्यायालयाचे स्वप्नील मोरे, अविनाश सुरवसे, सोमशेखर बाहेरमठ हे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, वैभव मोरे, दत्ता मोरे, दत्ता माने, प्रवीण देशमुख, प्रवीण घाटगे, विजय माने, शुभम सावंत, बाळासाहेब पोळ, यश विभूते, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, रोहित कदम, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, राहुल इंडे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# अकलूज शहरातील अवैध कत्तलखाने भुईसपाट

## 'अकलूज नगरपरिषद व पोलिसांची संयुक्तपणे धाडशी कारवाई'



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज शहराच्या विविध भागामध्ये असणारे अवैध कत्तलखाने अकलूज नगरपरिषदेने जेसीबी मशीनच्या सहाय्याने भुईसपाट केले आहेत. अतिशय संवेदनशील भागामध्ये असणारे हे कत्तलखाने जमीनदोस्त करताना, अकलूज पोलिसांनी महत्वाची कामगिरी बजावली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे,पोलीस निरीक्षक नीरज उबाळे व अनेक पोलीस कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार व पशुकल्याण अधिकारी महाराष्ट्र शासन व विभागीय दांडाधिकारी माळशिरस यांच्या आदेशान्वये शहरातील रमामाता कॉलोनी, समतानगर, अकलाई कॉर्नर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण व अतिक्रमणाच्या आडून गोवंशाचे कत्तलखाने जोमाने सुरु होते.

त्यावर ताबडतोब कारवाई करत, अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी सिंघम स्टाईलने कारवाई करत, स्वतः जेसीबी मशीनमध्ये बसून अवैध बांधकाम पाडण्याचे काम केले. यावेळी नगरपरिषदेचे बांधकाम विभागाचे धोंडीराम भगणूरे, कार्यालयीन अधीक्षक सुनील काशीद, आरोग्य विभागाचे महिबूब शेख, विद्युत विभागाचे बाळासाहेब कांबळे, अतिक्रमण, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कत्तलखाना चालकांनी आपली बांधकामे, पत्राशेड पडली जाऊ नयेत म्हणून मोठा विरोध केला होता. परंतु अकलूज पोलिसांनी हा विरोध मोडून काढत कत्तलखाने उध्वस्त केले.ही बांधकामे पाडण्यापूर्वी सदर लोकांना नगरपरिषदेने नोटीस काढून सूचना दिली होती.

तरीही या लोकांनी आपले उद्योग बंद केले नव्हते.

**अकलूजच्या दोन अधिका-यांची धडाकेबाज कामगिरी**

अकलूज ग्रामपंचायत अस्तित्वात असताना अशीच कामगिरी धडाडीचे कार्य करणारे सोलापूरचे तात्कालीन जिल्हाधिकारी तुकाराम मुंडे यांनी, अकलूज येथील गांधी चौक ते कर्मवीर चौकापर्यंतचे सर्व अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले होते.हे प्रशासकीय काम अकलूज पोलीस स्टेशनला दिले होते. त्यावेळेसचे अकलूज पोलीस स्टेशनचे तात्कालीन पोलीस निरीक्षक विश्वास साळुंखे यांनी धडाकेबाज कारवाई करत एका दिवसात अकलूजमधील सर्व अतिक्रमण काढली होती.त्यानंतर काल अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी स्वतः जेसीपीमध्ये बसून सिंघम कारवाई करत सर्व अवैध कत्तलखाने जमीनदोस्त करत कारवाई केली, त्यामुळे या दोन अधिका-यांचे कार्य अकलूजकर कधीच विसरणार नाहीत.

# 'प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा' : रणजितसिंह नाईक-निंबाळकर



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज, गोपाळपूर येथे भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान २०२६ 'कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्रदेश सचिव आ. रामभाऊ सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या प्रशिक्षण वर्गात संघटन मजबुती, विचारधारा, बूथ व्यवस्थापन, सोशल मीडिया, कार्यविस्तार, सर आणि देशासमोरील आव्हाने अशा विविध विषयांवर मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले. दरम्यान प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांना संघटन बळकटीची नवी दिशा मिळेल असा विश्वास मा. खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपा पदाधिकारी, जिल्ह्यातील विविध मंडळांचे कार्यकर्ते, बूथ प्रमुख, बीएलए -1 प्रतिनिधी तसेच युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मा. श्री पुनीतजी जोशी यांनी 'विकास, संगोपन आणि जबाबदारी जाणीव'या विषयावर मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांनी समाजाशी सतत संपर्क ठेवून जबाबदारीने संघटन कार्य करावे, असे सांगितले. त्यांनी विकासकामांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे ही आवाहन केले.

यावेळी मा. श्री महेरदीप महेश पाटणे यांनी 'SIR' विषयावर मार्गदर्शन करत बूथ स्तरावर मतदार यादी शुद्धीकरण मोहिमेची माहिती दिली.

बोगस मतदारांची नावे कमी करणे, पात्र मतदारांची नोंदणी करणे आणि मतदार यादी अधिक पारदर्शक करण्यासाठी बीएलए-1 यांनी सक्रियपणे काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथवर जबाबदारीने काम करून संघटन अधिक सक्षम करावे, असेही त्यांनी सांगितले.

तर पश्चिम महाराष्ट्र विभागीय संवादक मा. श्री योगेशजी बाचल यांनी 'बूथ व्यवस्थापन' विषयावर मार्गदर्शन करत प्रत्येक बूथ हा पक्षाचा मजबूत पाया असल्याचे सांगितले. बूथनिहाय नियोजन, मतदार संपर्क, कार्यकर्त्यांमधील समन्वय आणि निवडणूक व्यवस्थापन यावर त्यांनी विशेष भर दिला. तसेच महाराष्ट्र राज्य ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार मा. श्री योगेशजी (आण्णा) टिळेकर यांनी 'कार्यविस्तार' या विषयावर मार्गदर्शन करत भाजपा विचारधारा गावागावात पोहोचविण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रिय भूमिका घ्यावी, असे सांगितले. संघटन वाढीसाठी नव्या कार्यकर्त्यांना जोडण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण संयोजक तथा जिल्हा सरचिटणीस मा. श्री सचिनजी शिंदे यांनी 'विचार परिवार' या विषयावर मार्गदर्शन करत भाजपा ही केवळ राजकीय संघटना नसून राष्ट्रहिताची विचारधारा असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी वैचारिक बांधिलकी जपत समाजात काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सोलापूर ग्रामीण (माढा) जिल्हा प्रभारी मा. श्री संजय जगताप साहेब यांनी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यांनी विविध सत्रांची माहिती घेत कार्यकर्त्यांशी संवाद साधला व प्रशिक्षण वर्गाचे कौतुक केले.

श्री भारतजी आमदापुरे यांनी 'देशासमोरील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करत राष्ट्रीय सुरक्षेपासून आर्थिक विकासापर्यंत विविध मुद्द्यांवर विचार मांडले. बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत कार्यकर्त्यांनी सजग राहून जनतेमध्ये सकारात्मक संदेश पोहोचवावा, असे त्यांनी सांगितले.

मा. श्री अनिकेतजी निकम यांनी 'सोशल मीडिया आणि नमो 'ॲप' या विषयावर मार्गदर्शन करत डिजिटल माध्यमांचे वाढते महत्त्व स्पष्ट केले. सोशल मीडियाच्या माध्यमातून शासनाच्या योजना आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले. नमो ॲप चा प्रभावी वापर करून कार्यकर्त्यांनी संघटनाशी सातत्याने जोडलेले राहावे, असेही त्यांनी सांगितले.

मा. श्री सुरेशजी हळवणकर यांनी 'भाजपा इतिहास' या विषयावर मार्गदर्शन करत भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या प्रवासाचा आढावा घेतला. राष्ट्रहित, संघटनशक्ती आणि विचारधारा यावर भाजपा उभी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण वर्गाचा निरोप समारंभ माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय पाणीदार माजी खासदार मा. श्री रणजितसिंह (दादा) नाईक-निंबाळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. दिपकजी वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण वर्ग उत्साहात पार पडला. त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने संघटन कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणामुळे पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती तथा भाजपा सोलापूर जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मानले.

संपूर्ण कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. विविध विषयांवरील सत्रांमुळे कार्यकर्त्यांना संघटन, निवडणूक व्यवस्थापन, डिजिटल प्रचार आणि वैचारिक बांधिलकी याविषयी सखोल माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियान संयोजक श्री. सचिन शिंदे, सहसंयोजक श्री. दत्तात्रय जाधव तसेच सर्व आयोजक समिती यांची सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

# ३६ गुण नव्हे, कर्तृत्व महत्त्वाचे; मराठा वधू-वर मेळाव्यात कालबा' परंपरांवर प्रहार : साडेचारशे वधू-वरांचा सहभाग



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विवाह जुळवताना पत्रिका, मंगळ दोष, ९६ कुळी आणि गुण-जुळवणी यांसारख्या बाबींना अवाजवी महत्त्व दिल्यामुळे अनेक योग्य विवाह प्रस्ताव केवळ पारंपरिक कारणांमुळे नाकारले जात असल्याची खंत व्यक्त करत, ३६ गुण जुळले तरी विवाह मोडतात; त्यामुळे पत्रिकेपेक्षा मुला-मुलींच्या शिक्षण, स्वभाव, कर्तृत्व आणि भविष्याला प्राधान्य द्या असा ठाम संदेश मान्यवरांनी दिला.

मराठा सेवा संघ संचलित मराठा वधू-वर कक्षाच्या वतीने आयोजित ३२ वा विवाह परिचय मेळावा रविवारी (२४ मे) निर्मलकुमार फडकुले सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील होते. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक मनीष केत, विनोद भोसले, अनंत जाधव, मृण्मयी , गवळी, कल्पना कदम, माजी नगरसेवक पद्माकर काळे, बाळासाहेब माने, माजी परिवहन सभापती राजन जाधव, बिल्डर असोसिएशन चेअरमन दत्ता मुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन आणि जिजाऊ वंदनेने झाली. प्रास्ताविकात सदाशिव पवार यांनी मराठा सेवा संघाच्या वधू-वर मेळाव्यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

नगरसेवक मनीष केत यांनी मुलांच्या पगारापेक्षा त्यांच्या कर्तृत्वाला महत्त्व देण्याची गरज व्यक्त केली. तर राजन जाधव यांनी विवाह सोहळ्यांतील अनावश्यक खर्च, प्री-वेडिंगसारख्या वाढत्या ट्रेंडवर टीका करत विवाह साधेपणाने करण्याचे आवाहन केले. नगरसेवक आनंत जाधव यांनीही मुलांच्या गुणवत्तेला प्राधान्य देण्यावर भर दिला.

अध्यक्षीय भाषणात प्रशांत पाटील यांनी मराठा समाजात विवाह जुळवताना येणाऱ्या अडचणी, ९६ कुळी संदभार्तील गैरसमज, पत्रिका आणि मंगळ दोषांवर भाष्य करत या बाबींपेक्षा मुलांच्या कर्तृत्वाकडे पाहण्याची गरज अधोरेखित केली. या मेळाव्यात ४५० हून अधिक वधू-वर आणि पालकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील, अंबादास सपकाळे, राम माने अभिंजली जाधव, आर. पी. पाटील, प्रकाश ननवरे लता डेरे, प्रीती कदम, राजू व्यवहारे प्रा. जीवन यादव, रमेश जाधव, परशुराम पवार, प्रदीप कळंब, विश्वनाथ गायकवाड, मनोज मोरे, अविनाश गोडसे, दीपक शेळके गोवर्धन गुंड, दत्ता जाधव, प्रकाश डोंगरे, नवनाथ कदम, , नितीन मोहिते, सचिन चव्हाण, कल्याण गव्हाणे, राजु मिरकले यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पवार तर आभार प्राध्यापक लक्ष्मण महाडिक यांनी मानले. या वधू वर परिचय मेळावा शहर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात वधुवर आणि पालक उपस्थित होते.

# आदिला परिसरातील नागरी प्रश्नांवर पालकमंत्र्यांना निवेदन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज जयंती तसेच 'संभाजी आरमार' च्या १८ व्या वर्धापन दिनानिमित्त वोरोनोको प्रशाला येथे आयोजित मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर आदिला परिसरातील प्रलंबित नागरी प्रश्नांबाबत आदिला संवर्धन कृती समितीच्या वतीने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन सादर करण्यात आले.

आदिला संवर्धन कृती समितीचे अध्यक्ष राजकिरण चव्हाण यांनी बाळे, वसंत विहार व परिसरातील नागरिकांच्या समस्या मांडताना रेड लाईन व ब्ल्यू लाईन संदर्भात निर्माण झालेल्या नागरिकांच्या चिंता, वाढता पूरधोका तसेच विविध नागरी प्रश्नांकडे लक्ष वेधले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे तसेच संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

निवेदनात वेंकटेश्वरा सिटी, स्वराज विहार, रिद्धीसिद्धी नगर, संकेत थोबडे नगर, गोकुळ विहार, भगवंत विहार आणि वृंदावन पार्क ते देगाव परिसरातील हजारो नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचा उल्लेख करण्यात आला. विशेषतः रेड व ब्ल्यू लाईनबाबत नागरिकांच्या मनात अनेक शंका निर्माण झाल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

यामध्ये DP-2043 मध्ये रेड व ब्ल्यू लाईनचा स्पष्ट उल्लेख का नाही?, पूर्वी मंजूर बांधकामांचे भवितव्य काय असेल?, पूररेषा निश्चित करण्यासाठी कोणते निकष वापरण्यात आले?, बाधित नागरिकांसाठी भरपाई किंवा पर्यायी उपाय काय असतील? तसेच नागरिकांना हरकत नोंदविण्याची संधी मिळणार का? असे प्रश्न उपस्थित करण्यात आले.

समितीने याकडेही लक्ष वेधले की, संबंधित विभागांकडे यापूर्वी अनेकदा पाठपुरावा करूनही अपेक्षित गतीने कार्यवाही झालेली नाही. काही महिन्यांपूर्वी आदिला परिसरात केवळ वरवरचा गाळ काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून आवश्यक त्या प्रमाणात खोलीकरण व रुंदीकरण झाले नसल्याने आगामी पावसाळ्यात गतवर्षीप्रमाणे पूरस्थिती निर्माण होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

यावेळी समितीने बाळे पूल ते १४ कमान रेल्वे पूल या सुमारे १.८ किलोमीटर भागात तात्काळ खोलीकरण व रुंदीकरण करणे, आदिला पात्राच्या दोन्ही बाजूंना सिमेंटच्या संरक्षक भिंती उभारणे, हिप्परगा तलावाचे गाळमुक्तीकरण करणे, रेड व ब्ल्यू लाईनसंबंधी तांत्रिक माहिती व नकाशे सार्वजनिक करणे, नागरिकांसाठी सार्वजनिक सुनावणी घेणे, तसेच पूर्वी मंजूर बांधकामांना कायदेशीर संरक्षण देण्यासह विविध मागण्या केल्या.

निवेदनाची दखल घेत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या प्रश्नांबाबत संबंधित विभागांशी चर्चा करून लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

'आदिला परिसराचे संवर्धन, पूरनियोजन व पर्यावरणीय संरक्षण महत्त्वाचे असले तरी त्या प्रक्रियेमुळे हजारो नागरिकांच्या घरांवर व आर्थिक स्थैर्यावर परिणाम होणार नाही, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. विकासाला विरोध नसून पर्यावरण संवर्धन आणि नागरिक हित यांच्यात संतुलन राखून शाश्वत उपाययोजना व्हाव्यात,' अशी भूमिका समितीच्या वतीने मांडण्यात आली.

यावेळी समितीचे राजेश बळगानुरे, प्रसाद गोडसे, डॉ. उत्कर्ष वैद्य, विक्रांत गुंड, विशाल दळवे, अनमोल ढवळशंख, अजिंक्य पाटील यांच्यासह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते. संबंधित विभागांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# प्रभाग २६ मधील रस्ते समस्ये बाबत अतिरिक्त आयुक्त यांना निवेदन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू.

जुळे सोलापूर व प्रभाग क्रमांक 26 मध्ये लक्ष्मी कंट्रक्शन कडून ड्रेनजचे कामे केली आहेत परंतु रस्ते खोदून ठेवलेले आहेत. इस्टिमेट प्रमाणे सदर रस्ते आहे त्या स्थितीत करून देणे क्रमप्राप्त असताना खालील ठिकाणी ओम गर्जना चौक ते बॉम्बे पार्क, कृष्णा कॉलनी, शिक्षक सोसायटी, गुरुदेव दत्त नगर भाग १ ते ५, हेरिटेज फ्रॉम, प्रियांका नगर, पंचवटी नगर, विश्व नगर, रोहिणी नगर भाग १, येथे रस्ते अद्यापही डांबरीकरण व कॉंक्रिटीकरण केलेले नाहीत सदरचे रस्ते पावसाळ्यापूर्वी करणेबाबत निवेदन सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेता नरेंद्र काळे, यांना लेखी निवेदन दिले असून सदर कामे पावसाळ्यापूर्वी न केल्यास जुळे सोलापूर मधील नागरिकांना घेऊन सोलापूर महानगरपालिकेवर मोर्चा काढण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे.

त्याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री संदीप कारंजे साहेब यांनी समक्ष संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना फोनवरून सूचना दिल्या आहेत की येत्या आठवडाभरात सदरची कामे तातडीने करून घेणे बाबत आदेश दिले असून लवकरच सदरचे रस्ते दुरुस्त करून देण्याचे ठोस आश्वासन दिले आहे.

त्याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण यांनी प्रभागातील विविध समस्या बाबतीत अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

# आत्महत्येच्या उंबरठ्यावर असलेल्या शेतकऱ्याला दिला न्याय



**वैराग (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील वैराग परिसरात संवेदनशील पोलिसिंगचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. आर्थिक व्यवहाराच्या गुंत्यात अडकून पडलेली एका अपंग शेतकऱ्याची अडीच एकर शेतजमीन वैराग पोलिसांच्या मध्यस्थीमुळे पुन्हा त्याच्या ताब्यात मिळाली.

हक्काची जमीन गमावण्याच्या भीतीने संबंधित शेतकरी नैराश्यात गेला असून आत्महत्येच्या मानसिकतेत असल्याची माहिती वैराग पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुंदन गावडे यांना मिळताच त्यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घातले.

गावचे पोलीस पाटील गणेश मसाळ यांच्या माध्यमातून दोन्ही पक्षांना वैराग पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले. पोलिस निरीक्षक गावडे यांनी दोन्ही बाजू शांतपणे ऐकून घेत प्रकरणाची सखोल माहिती जाणून घेतली. संबंधित जमीन आर्थिक व्यवहारामुळे अडकून पडल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनी दोन्ही पक्षांना मान्य होईल असा समझोत्याचा मार्ग सुचविला.

गावडे यांनी मांडलेला प्रस्ताव दोन्ही पक्षांनी आनंदाने स्वीकारला. त्यामुळे कोणताही वाद, तणाव किंवा संघर्ष न होता संबंधित अपंग शेतकऱ्याला त्याची हक्काची अडीच एकर जमीन परत मिळाली. या घटनेमुळे शेतकऱ्याला मोठा मानसिक दिलासा मिळाला असून परिसरात वैराग पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

यावेळी पोलिस निरीक्षक कुंदन गावडे म्हणाले, 'समाजात पोलिसांविषयी अनेकदा अवास्तव भीती निर्माण झालेली असते. मात्र पोलीस यंत्रणाही संवेदनशीलतेने काम करणारी व्यवस्था आहे. संवाद आणि समझोत्याच्या माध्यमातून अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सहज मार्गी लागू शकतात.' दरम्यान, अपंग शेतकऱ्याला न्याय मिळवून दिल्याबद्दल अतुल कुलकर्णी तसेच अंजना कृष्णा यांनी वैराग पोलीस ठाण्याच्या कायार्चे विशेष कौतुक केले. ही घटना पोलिसांच्या लोकाभिमुख आणि संवेदनशील कार्यपद्धतीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे.

# अतिक्रमण व अवैध धंद्याविरोधात करमाळा नगरपरिषदेला निवेदन

## कारवाईची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** करमाळा शहरातील कानाड गल्ली परिसरातील नागरिकांनी अतिक्रमण, अवैध धंदे, अस्वच्छता आणि महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नावरून करमाळा नगरपरिषदेकडे निवेदन सादर करत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. परिसरात वाढत्या बेकायदेशीर प्रकारांमुळे नागरिक भयभीत वातावरणात जीवन जगत असल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, कानाड गल्ली परिसरातील शासकीय गटारांवर तसेच पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमण करण्यात आले असून, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. परिणामी अपघातांची शक्यता वाढली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याच परिसरात अवैध मटन व मासे विक्री, मटका व्यवसाय, बेकायदेशीर दारू विक्री तसेच अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्याने नागरिकांना पाणी भरण्यास अडचणी निर्माण होत आहेत. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. तसेच पाण्याच्या टाकीवर कमी नळतोट्या असल्याने नागरिकांमध्ये वारंवार वाद व भांडणे होत असल्याने सर्व बाजूंनी अतिरिक्त नळतोट्या बसविण्याची मागणीही करण्यात आली आहे.

निवेदनात काही व्यक्तींकडून धमकी, दमदाटी, मारहाण तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिक भीतीच्या छायेत राहत असल्याचे सांगण्यात आले.

महिलांच्या सुरक्षेबाबतही नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. परिसरात संशयित व्यक्तींचा वावर वाढल्याने महिलांना त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच परिसरात छेडछाडीच्या घटनाही घडत असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. अलीकडेच पुणे येथे चार वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून हत्या झाल्याच्या घटनेचा संदर्भ देत, अशा प्रकारच्या घटना येथे घडू नयेत यासाठी प्रशासनाने वेळीच कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदर अतिक्रमण, अवैध मटन विक्री व इतर बेकायदेशीर प्रकारांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी प्रशासनाला दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, आरोग्यमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महिला आयोग, करमाळा तहसीलदार तसेच स्थानिक पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.